# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)

क्र. मऔविम/भुविभाग/कार्यासन-१/B93982

"उद्योग सारथी",
मरोळ औद्योगिक क्षेत्र,
महाकाली गुंफा मार्ग,
अंधेरी (पूर्व), मुंबई-९३
दिनांक : 29/06/2015

## परिपत्रक

**विषय : भूखंडाचे वाटप रद्द करुन ताब्यात घेतल्याने अधिमूल्याची रक्कम परत करणे**

महामंडळाने अविकसित भूखंडावर केलेल्या कार्यवाहीच्या अनुषंगाने भूखंडधारकाने स्वतःहून भूखंड परत केल्यास अथवा महामंडळाने पंचनाम्याद्वारे भूखंड ताब्यात घेतल्यास महामंडळाच्या दि. ०६.०३.२०१३ चे परिपत्रकातील निर्देशानुसार वार्षिक भूभाडे, सेवा शुल्क तसेच इतर सर्व देय रक्कमा व मुदतवाढीकरीता अतिरिक्त अधिमूल्याची रक्कम वसुल करुन उर्वरित रक्कम परत करण्यात येते. तथापि, अनेक प्रकरणांमध्ये महामंडळास देय असलेली रक्कम ही परतावा रक्कमेपेक्षा जास्त असते. महामंडळास देय रक्कम जमिन महसूलाची थकबाकी म्हणून वसुल करण्याची तरतूद असली तरी याबाबत जिल्हाधिकारी यांचेकडून संबंधीतांच्या इतर स्थावर मालमत्तेचा सविस्तर तपशिल विचारला जातो. तथापि, भूखंडधारकाच्या इतर स्थावर मालमत्तेबाबत कोणतीही माहिती/तपशिल महामंडळाकडे उपलब्ध नसल्याने तसेच भूखंडधारकाचा शोध घेणे कठीण असल्याने अशा प्रकारे येणे असलेली रक्कम वसुल करणे शक्य होत नाही, यामुळे अनेक वर्ष भूखंड विनावापर रिक्त राहतात. असे भूखंड ताब्यात घेऊन त्यांचा उद्योगांसाठी वापर करणे आवश्यक आहे. सदर प्रक्रिया सुकर व्हावी म्हणून भूखंडधारकाने भरणा केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपेक्षा देय रक्कम जास्त असल्यास अधिमूल्याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यापर्यंत सिमित करण्याबाबतचा विषय मा. संचालक मंडळाच्या दि. ३०.०३.२०१५ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला होता. सदर विषयावर चर्चा होऊन ठराव क्र. ५४७६ (ब) पारित करण्यात आला आणि त्या ठरावाचे अनुषंगाने खालीलप्रमाणे धोरण निर्गमित करण्यात येत आहे-

"ज्या प्रकरणी भूखंडधारकाने स्वतःहून भूखंड परत केल्यास अथवा ज्या प्रकरणात भूखंडाचे वाटप रद्द करुन भूखंड पंचनाम्याद्वारे ताब्यात घेण्यात आला असल्यास अशा दोन्ही प्रकरणी अधिमूल्याची रक्कम परत करणेबाबत महामंडळाच्या दि. ०६.०३.२०१३ चे परिपत्रकाप्रमाणे सेवा शुल्क, इतर देय रक्कमा व मुदतवाढ शुल्क मिळून येणारी रक्कम ही भूखंडधारकांनी भरणा केलेल्या अधिमूल्याच्या रक्कमेपेक्षा जास्त असल्यास

भरलेली अधिमूल्याची संपूर्ण रक्कम जप्त करण्यापर्यंत सिमित करण्यात यावी आणि त्याबाबतचे आदेश लेखा विभागाच्या पूर्वसंमतीने निर्गमित करण्यात यावेत."

भूखंडधारकाची जप्त केलेल्या रक्कमेचे समायोजन व निर्लेखन करणेकरीता रक्कमेची विगतवारीचा क्रम खालीलप्रमाणे ठेवण्यात येत आहे-

१. निव्वळ पाणी पुरवठयाची थकबाकी.
२. ड्रेनेज सेस
३. सेवा शुल्क
४. फायर सेस
५. ईपीएसी (Environment Protection Service Charge)
६. दंडनीय व इतर आकार
७. मिटर भाडे
८. सर्वांवरील विलंब शुल्क
९. भूविभागाशी निगडीत वसुली.

भूखंडधारकाची जप्त केलेली रक्कम उपरोक्त प्राधान्य क्रमानुसार समायोजित करणेबाबत लेखा विभागामार्फत कार्यवाही करण्यात यावी.

उपरोक्त नमूद धोरण हे सर्व प्रकारच्या भूखंडांकरीता तसेच सर्व प्रलंबित व या संदर्भात नव्याने प्राप्त होणा-या प्रकरणांना लागू करण्यात येत आहे.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

**(ए.एल.जऱ्हाड)**
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी**
**मऔविम, मुंबई**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.

११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई.